पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/ कावि/१/५५ /२०१७
दिनांक : ३१/०८ /२०१७

प्रति,
मा. - - - - - - - - - - - - - - - - - - - -
सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची सभा
सोमवार दि. ४/०९/२०१७ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ४/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील सभागृह येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग समिती
## **कार्यपत्रिका क्रमांक २**

दिनांक: ४/०९/२०१७ वेळ: दुपारी २.०० वाजता

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची सभा सोमवार दिनांक ४/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील सभागृह येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दि. ०९/०८ /२०१७ चे मासिक सभेचा ग प्रभाग समिती सभापती पदाचे निवडणुक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. १ ) कायम करणे.

विषय क्रमांक १) मा.श्री.अभिषेक बारणे यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

१) प्रभाग सभागृहाला 'ग्रामदैवत बापुजीबुवा सभागृह' नामकरण करण्यात यावे.

२) सफाई कर्मचारी वाढविणे.

३) सफाई वाहने (AS) वाढविणे.

४) मोकाट कुत्रीबाबत प्रभागासाठी वेगळी गाडी घेणे.

५) प्रभागात धुर /पावडर नियमित करणे.

६) प्रभागात धुर गाडीची संख्या वाढविणे.

७) ड्रेनेज सक्शन गाडी व ड्रेनेज दुरुस्ती बाबत गाडी वाढवणे.

८) मैला वाहतुक गाडी वाढविणे.

९) नागरी सुविधा केंद्रे निर्माण करणे.

१०) पावसामुळे रस्त्यास पडलेले खड्डे त्वरीत बुजविणे.

११) कचरा व साफसफाई करणे. प्रभागामध्ये सफाई टिम तयार करुन स्वच्छता मोहिम राबविणे.

१२) प्रभागामधील हॉटेल व्यावसायिक करीता रात्री १२ वाजेनंतर जमा होणारा हॉटेल वेस्ट कचरा उचलणे बाबत दररोज कार्यवाही करणे.

१३) सीसीटीव्ही कॅमेरे चौकात, रस्त्यावर, मुख्य रस्त्यावर व कचरा टाकण्याच्या जागेवर इ.ठिकाणी बसविणे.

१४) कुठेही मुख्य रस्त्यावर कचरा कुंडया ठेवु नये. कचरा कुंडया विरहित प्रभाग करणे.

१५) प्रभागात मॉडेल कचरा पेटी बसविणे, कॉलनीचे नाव, सुचना फलक, सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे.

विषय क्रमांक २) मा.मनिषाताई प्रमोद पवार यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

१) प्रभाग क्रमांक २३ मधील रस्ते नुतनीकरण व दुरुस्ती करुन मिळावी.

२) संपुर्ण प्रभागामध्ये काँक्रीट ब्लॉक नवीन बसविणे व दुरुस्ती करुन मिळणेबाबत.

३) प्रभागामध्ये चौकांना नवीन नाम फलक बसविणेबाबत..

४) प्रभागामध्ये विजेचे नवीन पोल व त्यावरती दिवे बसवुन मिळावे.

५) प्रत्येक चौकामध्ये हायमास्ट दिवे बसवुन मिळणेबाबत.

६) प्रभागामध्ये दैनंदिन कचरा व्यवस्थापन व नवीन वाहन व्यवस्था करुन मिळणेबाबत..

७) प्रभागामध्ये नवीन वृक्षारोपण व असलेल्या झाडांसाठी संरक्षक गार्ड, कुंपण व काँक्रीट आळी करुन मिळणेबाबत..

विषय क्रमांक ३) मा.अर्चना बारणे यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

१) प्रभाग क्र.२३ मधील थेरगाव गावठाण स्मशान भूमी मधील सुशोभिकरण करण्याबाबत व ई (स्नान गृह व शौचालय)

२) प्रभागातील पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन २० वर्षापुर्वीच्या जुन्या असुन पाण्याच्या पाईप लाईन पुर्णपणे गंजलेल्या अवस्थेत आहेत त्यांचे नुतनीकरण होण्याबाबत..

३) लोकवस्ती मोठया प्रमाणात वाढल्यामुळे पुर्वी लहान व्यासाच्या सांडपाणी वाहुन नेणा-या वाहिन्यांवर जास्त दाब येत असल्यामुळे त्या मोठया व्यासाच्या बनवण्याची गरज भासत आहे ती पुर्ण करुन मिळण्याबाबत..

४) ग प्रभाग कार्यालय समोरील शिवाजी पुतळा येथील सुशोभीकरण करण्याबाबत..

५) थेरगाव येथील स्मशान भूमी मध्ये पाण्यासाठी बोरवेल ची व्यवस्था करुन देण्याबाबत..

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
गक्षेका / कावि/१ /५५ /२०१७
दिनांक : ३१ /०८ /२०१७